# सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या पदाच्या जाहिरातीबाबत जाहिर सुचना

सिडको महामंडळाने दि. 18.01.2024 रोजी सहाय्यक अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. तसेच, दि.15.03.2024 रोजी प्रसिद्ध केलेल्या शुद्धिपत्रकाद्वारे सदर जाहिरातीमध्ये प्रसिद्ध केलेल्या रिक्त पदांच्या आरक्षणात बदल करण्यात आल्याचे कळविण्यात आले होते.

अन्वये, उमेदवारांना त्यांनी सादर केलेल्या ऑनलाईन अर्जामध्ये प्रवर्ग बदलावयाचा असल्यास ऑनलाईन लिंक सिडको संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविण्यात आले होते.

शासन निर्णय दिनांक 27 फेब्रुवारी, 2024 अन्वये जातीचा प्रवर्ग बदलू इच्छित असणाऱ्या उमेदवारांकरीता स्वतंत्रपणे लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. जात प्रवर्ग बदलण्यास इच्छुक उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना:-

1. https://ibpsonline.ibps.in/cidcoapr23/ या लिंकद्वारे इतर मागास वर्ग (OBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) व खुल्या/ अराखीव प्रवर्गातील (OPEN) उमेदवारांना त्यांचा प्रवर्ग बदलून एसईबीसी (SEBC) प्रवर्गातून दि. 11.07.2024 ते दि. 27.07.2024 या कालावधीत अर्ज सादर करता येणार आहे.
2. वरील मुद्दा क्र.1 अन्वये प्रवर्ग बदलु इच्छिणाऱ्या उमेदवारांव्यतिरिक्त यापुर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना जर त्यांचा प्रवर्ग बदलून इतर प्रवर्गातुन नव्याने अर्ज सादर करावयाचा असल्यास -
   a. अशा उमेदवारांना नजिकच्या काळात www.cidco.maharashtra.gov.in या सिडको संकेतस्थळावर करिअर सेक्शन अंतर्गत लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल त्या लिंकद्वारे नव्याने अर्ज सादर करावा लागेल.
   b. तसेच नव्याने परीक्षा शुल्क भरावे लागेल व याआधी भरणा करण्यात आलेल्या परीक्षा शुल्काचा परतावा मिळणार नाही.
   c. एकापेक्षा अधिक अर्ज सादर केलेल्या उमेदवारांच्या अर्जांपैकी त्यांनी सादर केलेला शेवटचा अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.
3. वरील मुद्दा क्र.1 व 2 व्यतिरिक्त नव्याने अर्ज सादर करु इच्छिणाऱ्या उमेदवारांकरीता नजिकच्या काळात www.cidco.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर करिअर सेक्शन अंतर्गत लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरीता उमेदवारांनी सिडको संकेतस्थळाला भेट द्यावी.

व्यवस्थापक (कार्मिक)

दि.10.07.2024